ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 2 | OCTOBER - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# लोकमान्य टिळकांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद



**प्रा. डॉ. लक्ष्मण बाबाराव यादव**
**राज्यशास्त्र विभाग,**
**बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा.**

## अल्पपरिचय :-

आधुनिक भारताचे निर्माते स्वातंत्र्य आंदोलनात जहालवादी भूमिका घेऊन, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्वपूर्ण योगदान देणारे,स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे,आणि तो मी मिळवणारच असे प्रतिपादन करणारे प्रखर राष्ट्रवादी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म 23 जुलै 1856 रोजी रत्नागिरी येथे ब्राह्मण कुटुंबात झाला.वडील गंगाधर शास्त्री हे संस्कृत व शिक्षक होते.लोकमान्य टिळकांचे प्राथमिक शिक्षण रत्नागिरी झाले. पुढे पुण्यातील इंग्लिश स्कूलमध्ये व डेक्कन कॉलेज मधून गणित आणि संस्कृत या विषयांमध्ये पदवी प्राप्त केली. व तसेच पुढे त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले लहानपणापासून टिळकांचा स्वभाव बुद्धिमान, जिद्दी, आणि तत्वनिष्ठ होता. इंग्रजी शिक्षणात राष्ट्रवादाचा अभाव दिसल्याने त्यांनी भारतीय शिक्षण व राष्ट्रभक्तीचे महत्त्व ओळखले. आपल्या जीवनात शिक्षक म्हणून कार्याला सुरुवात केली. केसरी, मराठा ही वृत्तपत्र सुरू करून संपूर्ण भारतीयांमध्ये राष्ट्रवाद प्रज्वलित करण्याचे महत्त्वाचे कार्य लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले आहे. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात ब्रिटिशांच्या विरोधात कठोर भूमिका घेऊन,भारतीय स्वातंत्र्य आंदोलनावर जहालवादी विचाराचा प्रभाव त्यांनी निर्माण केला, ब्रिटिशांचे नाक दाबल्याशिवाय त्यांचे तोंड उघडणार नाही.अशी कठोर भूमिका घेऊन ब्रिटिशांना भारताला स्वातंत्र्य देण्यास भाग पाडले पाहिजे. अशी जहालवादी भूमिका लोकमान्य टिळक यांनी घेतली. लोकमान्य टिळकांनी ब्रिटिशांच्या प्रशासनाला फार मोठे आव्हान दिल्यामुळे ब्रिटिशांनी त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल केला. त्यांना मंडाले च्या तुरुंगामध्ये सहा वर्ष तुरुंगवासाची शिक्षा झाली. त्यांनी गीतारहस्य हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात संपूर्ण भारतीयांना एकसंघ उभे करण्याकरिता लोकमान्य टिळक यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. याचाच एक भाग म्हणून 1916 च्या लखनौ करारात कॉँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यात एकता घडून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आणि सर्वसामान्यमध्ये स्वातंत्र्य लढ्याबद्दल आशा व आत्मविश्वास निर्माण केला. लोकमान्य टिळकांच्या जीवनाच्या शेवटच्या टप्प्यात त्यांचे आरोग्य ढासाळले जाऊ त्यांची राजकीय सक्रियता कमी होऊ लागली.आणि शेवटी, 1 ऑगस्ट 1920 रोजी या महान भारतीय क्रांतिकारी राष्ट्रवादाचे जनक यांचे मुंबई येथे निधन झाले. स्वराज्याचा उन्मेष,

सांस्कृतिक राष्ट्रवाद, जनजागृती आणि शैक्षणिक पुनरुत्थान यांचे आधारस्तंभ सामाजिक व सांस्कृतिक चळवळी, पत्रकारिता व राजकीय नेतृत्व यातून भारतीय स्वातंत्र लढ्यातील योगदान अद्वितीय असे होते.

**लोकमान्य टिळकांचा सांस्कृतिक राष्ट्रवादी:-** लोकमान्य टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रणेते मानले जातात. त्यांनी भारतीय समाजाला राजकीय pस्वातंत्र्याच्या लढ्यासाठी एकसंघ करण्यासाठी धर्म,परंपरा, इतिहास, संस्कृती, आणि राष्ट्रीय अभिमान यांचा अत्यंत योग्य आणि परिणामकारक वापर केला. त्यांचा सांस्कृतिक राष्ट्रवादाचा मूलाधार म्हणजे हिंदू धर्म ग्रंथ, उत्सव,परंपरा इतिहासातील वीर परंपरा तसेच सामाजिक राष्ट्रीय अभिमान यावर आधारलेला होता. लोकमान्य टिळकांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद पुढील घटकाच्या आधारे स्पष्ट करता येईल.

### 1) सांस्कृतिक राष्ट्रवादाचा मुलाधार :-

लोकमान्य टिळकांचा भारतीय संस्कृतीवर प्रचंड विश्वास होता. भारतीय संस्कृती जी काही नीतिमूल्य अस्तित्वात आहेत. त्याच्या आधारेच त्यांनी भारतीयांमध्ये राष्ट्रवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादात भारत एक राष्ट्र आहे.याची जाणीव करून त्यामध्ये सामूहिक सांस्कृतिक वारसा जोपासला अखंड भारतात हिंदू धर्म उत्सव, परंपरा, इतिहासातील वीर परंपरा तसेच सामायिक राष्ट्रीय अभिमान यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता. म्हणूनच लोकमान्य टिळकांनी राजकीय स्वातंत्र्यासाठी आधी सास्कृतिक एकात्मता भारतात निर्माण होणे अत्यंत महत्त्वाची आहे.असे लोकमान्य टिळकांना मनोमन वाटत असे.

### 2) टिळकांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाची घटक :-

लोकमान्य टिळकांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद हिंदू धर्म, धर्मग्रंथ, संस्कृती व नीतिमूल्य याच्या आधारावर आधारलेला होता.

### अ) वेद गीता आणि धर्मग्रंथांचे राष्ट्रीयीकरण :-

टिळकांच्या सांस्कृतिक राष्ट्रपदाचा पहिला महत्त्वाचा मुलाधार म्हणजे टिळकांनी भगवत गीतेवर लिहिलेला त्यांचा गीता रहस्य हा ग्रंथ सांस्कृतिक राष्ट्रवादाचा प्रमुख आधार मानला.त्यात त्यांनी गीतेला केवळ धार्मिक न मानता कर्तव्य,कर्मयोग आणि संघर्ष यांचे ग्रंथ म्हणून सादर केले. कर्मयोग त्याग अन्यायाविरुद्ध संघर्ष हा भारतीयांचा मूळ स्वभाव आहे. ही कल्पना युवकांना स्वदेशासाठी झटण्यास प्रेरणा देणारी असे टिळक म्हणत.

### ब) सार्वजनिक गणेशोत्सव (1894):-

लोकमान्य टिळकांचा सर्वात महत्त्वाचं सांस्कृतिक प्रयोग म्हणजे सार्वजनिक गणेश उत्सव होय. हा उत्सव सादर करण्यामागे टिळकांची भूमिका समाजात एकात्मता आणि सामाजिक भाव निर्माण करणे, जातीभेद व समाजातील सामाजिक भिंती पडणे, ब्रिटिशांच्या विरोधात जनमानस तयार करणे, धार्मिक कार्यक्रमांना राष्ट्रीय आणि राजकीय रंग देणे, यामुळेच गणेश

उत्सवाला भारतीय संस्कृतीचे प्रतीक बनवले आणि याच माध्यमातून भारतीय स्वातंत्र्याचा विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचवला

### क) शिवजयंती (1896):-

लोकमान्य टिळकांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाचा मुलाधार म्हणजे शिवजयंती होय. टिळकांनी छत्रपती शिवाजी महाराजांना राष्ट्रीय आदर्श म्हणून भारतीय युवकासमोर एक नवा आदर्श निर्माण केला. अशा या शिवजयंती उत्सवाचा मुख्य उद्देश भारतीय समाजात वीर परंपरेचा अभिमान निर्माण करणे.ब्रिटिशांच्या विरोधात भारतीयांना उभे करणे. भारतीय युवकांमध्ये स्वाभिमान व नेतृत्व निर्माण करणे. शिवाजी महाराज हे स्वराज्याचे प्रतीक म्हणून टिळकांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा एक ऐतिहासिक पाया घातला.

### 3) लोकमान्य टिळकांची पत्रकारिता :-

लोकमान्य टिळकांनी ब्रिटिशा विरोधात भारतीयामध्ये राष्ट्रवादी चेतना निर्माण करण्यासाठी, वृत्तपत्राचे महत्त्व त्यांनी जाणले होते. त्या करिता केसरी हे मराठीतील आणि मराठा हे इंग्रजीतील वृत्तपत्र चालू केले.या वृत्तपत्रातून त्यांनी भारतीय इतिहासाची पुनर्वाचन,धर्मग्रंथाचे राष्ट्रीयकरण आणि अन्यायी ब्रिटिश धोरणांच्या विरोधात निषेध व्यक्त करणे. आणि भारतीयात सांस्कृतिक चेतना निर्माण करणे. या मुख्य उद्देशाने त्यांनी वृत्तपत्र चालवायला सुरुवात केली. या वृत्तपत्रातूनच टिळकांनी ब्रिटिशा विरोधात "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.आणि तो  मिळवणारच!" असे हक्काने सांगितले.

### 4) राष्ट्रनिर्मितीत धर्म आणि संस्कृतीचे योगदान :-

लोकमान्य टिळक हे धर्माबाबत कट्टर नव्हते. ते धर्म व संस्कृती यांना सामाजिक एकात्मतेचे साधन मानत होते. असे जरी असले तरी लोकमान्य टिळक समाजातील विविध घटकांमध्ये ऐक्य कशे निर्माण होईल, धर्माचा राजकारणात योग्य वापर झाला पाहिजे,आणि भारतातील राजकीय आंदोलने नैतिकीवर आधारित असले पाहिजे, त्यांनी भगवान गणेश, श्रीकृष्ण, शिवाजी, वेद- उपनिषद यांचा उपयोग राष्ट्र उभारणीसाठी सांस्कृतिक आधारस्तंभ म्हणून केलेला दिसतो.

### 5) ब्रिटिश धोरणावर टीका आणि सांस्कृतिक लढा :-

ब्रिटिशांनी भारतीय जनतेच्या सांस्कृतिक आत्मविश्वासावर आघात केला होता. असे टिळकांना वाटत असे. अशा या सांस्कृतिक दडपशाहीला प्रतिउत्तर म्हणून भारतीयांनी स्वतःच्या परंपरा, भाषा, धर्म, आणि इतिहासाचे पुनर्जीवन करणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत असे. अशी त्यांनी भारतीय  राष्ट्रवादीची कल्पना मांडली.

### 6) टिळकांच्या संस्कृतीक राष्ट्रवादाचा परिणाम :-

लोकमान्य टिळकांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद तात्विके ते बरोबरच व्यवहारवादी यावर भर देणारा होता. म्हणूनच त्यांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद भारतीय समाज मनावर खोलवर रुजलेला होता. भारतीय समाजावर अधिक व्यापक परिणाम करणारा

ठरला a)त्यांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादामुळे समाजात राष्ट्रीय चेतना निर्माण झाली.b) जनता राजकीय दृष्ट्या सक्रिय फोन ब्रिटिशांच्या विरोधात एक मुखाने उभी राहिली.c) भारतीय युवकांमध्ये गीता, इतिहास, वीर परंपरा यावरील विश्वास वाढवून त्यांच्या स्वाभिमान वाढला. D) लोकमान्य टिळकांनी आपल्या सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या आधारे स्वातंत्र्यलढ्याला राजकीय आंदोलनाचे व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले. E) टिळकांनी आपल्या सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या आधारे सावरकर, चित्तरंजनदास,बिपिन चंद्र पाल, नेहरू इत्यादी नेत्यासमोर एक नवा आदर्श समोर ठेवून त्यांच्यात प्रेरणा निर्माण केली.

## निष्कर्ष :-

लोकमान्य टिळकांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद अभ्यासल्यानंतर आपणाला असे म्हणता येते,की त्यांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा नवा आधारस्तंभ आणि भारतीय राष्ट्रभावनेला दीर्घकालीन दिशा देणारा ठरला. तसेच भारतीयांमध्ये इतिहासाबद्दल स्वाभिमान निर्माण करण्यात महत्वपूर्ण योगदान दिले. भारतात धर्माचे राष्ट्रीयकरण करून समाजामध्ये गणेश उत्सव व शिवत्सव यांचे राजकीयकरण करून समाजामध्ये एकतीची ज्योत पेटवण्याचे काम टिळकांनी केले त्याबरोबरच भारतीयांमध्ये स्वाभिमान आणि कर्मयोग निर्माण करण्यात देखील संस्कृतीत राष्ट्रवादीचे योगदान महत्त्वपूर्ण राहिलेले आहे.

## संदर्भ ग्रंथ :-


1) भारतीय समाज और संस्कृती - डॉ कृष्णदत्त द्विवेदी
2) भारतीय राजकीय विचारवंत- श्रीकांत विदेशपांडे
3) भारतीय राष्ट्रवाद - डॉ सत्येंद्र त्रिपाठी डॉ. कृष्णदत्त द्विवेदी
4) भारतीय राजनीतिक विचारक - बी एम शर्मा, रामकृष्ण दत्त शर्मा, सविता शर्मा
5) भारतीय राजकीय विचारवंत - प्रा डॉ कृ दि बोराळकर
6) भारतीय राजनीतिक विचारक - ओम प्रकाश गाबा
7) भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार - प्रा राम मुठाळ
8) Indian Political Thinkers - Dr Sunita Gangwal